# बीड एलसीबीकडून गांधीनगरच्या दोन नंबर वाल्यांवर कारवाई करण्याची नागरिकांमधून होतेय मागणी


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


## एस.पी. साहेब, आपल्या व्हाट्सअप वरती संबंधित पत्याच्या क्लबचे लोकेशन टाकले आहे


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २३९ ■ रविवार दि.१८ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 239 ■ Sunday Dt.18 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# गांधीनगर में रशीद मोघ्या का क्लब उगले साहब की दुवा से चालू है क्या?

## एसपी नवनीत कॉवत साहेब तुम्ही चांगले अधिकारी पण काही कर्मचारी वसुलीत अंधारात करतात त्याचं काय?

बीड । प्रतिनिधी
बीड जिल्हा हा गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार अधिकारी कर्मचाऱ्यांनी बरबटलेला आहे बीड जिल्ह्याला आका बोका खोका या सर्व नावांना सामोरे जावे लागले या अगोदरचे तत्कालीन पोलीस अधीक्षक हे वाल्मीक कराडच्या अवतीभवती वाल्मीक कराड यांच्यासमोर काही अतिशय होत होते. त्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार आणि हप्ते खोरी होत होती. यामध्ये प्रामुख्याने पाहिले तर बीड जिल्हा पोलीस प्रशासन बदनाम झालेले आहेत. जर पाहिले गेले तर हनुमंत उगले सारखा मनोरुग्ण



अल्पवयीन मुलीवर बलात्कारातील आरोपी यांना डायल ११२हून घटनास्थळावरून ताब्यात घेत स्टेशन या ठिकाणी गेल्यानंतर सुद्धा पोलीस स्टेशन मधून प्रति आरोपी ८० हजार रुपयांनी सोडून देतो आणि जेव्हा पेपर मध्ये बातम्या छापून येतात आणि जेव्हा सोशल मीडियावरती संबंधित बलात्कार झालेल्या मनोरुग्ण भिक मागून जगणाऱ्या मुलीचा व्हिडिओ व्हायरल होतो त्यावेळेस मात्र यांचे अनेकांचे धाबे दणांतात आणि अज्ञात आरोपीच्या विरोधात पेठ बीड पोलीस ठाण्यात

पान २ वर





भूमाता ब्रिगेडचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती ताई देसाई यांनी हनुमंत उगले हा भ्रष्ट असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यावरती कारवाई होणे गरजेचे हनुमंत उगले हा वाल्मीक कराडचा खातेदार आहे आणि त्याची बदली होणे गरजेचे आहे. वाल्मिक काराडने हनुमंत उगले वरती झालेली कारवाई ही तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी केलेली कारवाई ही रद्द करण्यासाठी अविनाश बारगळ यांच्यावर दबाव आणला होता. हनुमंत उगले या पोलीस कर्मचाऱ्यांनी मनोरुग्न असलेले अल्पवयीन मुलीवर बलात्कारातील आरोपी यांना पोलीस ठाण्यामध्ये आणल्यानंतर तडजोडी मध्ये सोडून दिले होते त्यामुळे असल्या भ्रष्ट पोलीस कर्मचारी पोलीस ठाण्यातून बदली व्हावी अशी ही मागणी गृहमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे दैनिक महाराष्ट्र आरंभशी बोलताना सांगितले आहे. बीड जिल्हा हा गुन्हेगारीचा बालेकिल्ला बनलेला आहे बीड जिल्हा पोलीस अधीक्षक हे चांगले एक उत्कृष्ट अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते परंतु त्यांनी हनुमंत उगले सारख्या वादग्रस्त कर्मचाऱ्यांच्या पाठीशी कोण उभा आहे याचा तपास घेणे गरजेचे आहे. हनुमंत उगले सारख्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांना पोलीस खात्यातून निलंबित करण्यात यावे अशी मागणी यावेळी आहे.

## वादग्रस्त वसुली बहादर पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या आता नेमकं ठाण्यामध्ये का मुख्यालयात?



हनुमंत उगले सह असे काही पोलीस कर्मचारीत किती पेठ बीड पोलीस ठाण्याच्या पीआयच्या विरोधामध्ये टीम राबवत आहेत पीआय यांनी संबंधित गुप्त यंत्रणेमार्फत पोलीस अधीक्षक यांना तसा रिपोर्टही पाठवलेला आहे अशी सूत्रांची माहिती की जे पोलीस कर्मचारी वादग्रस्त आहेत परंतु त्या ठिकाणी आता पोलीस अधीक्षक नेमकी काय भूमिका घेत आहेत याकडे पाहिले जात आहे.

कारण पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ६७६ पेक्षा जास्त पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणार असल्याचे बोलले जात आहे सध्या त्या बदल्याची प्रोसिजर चालू आहे परंतु असल्या वादग्रस्त हनुमंत उगले सारखे अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना आता पुन्हा एकदा वसुलीसाठी पोलीस स्टेशन मिळते का नाही हे पाहणे गरजेचे आहे.



एस पी साहेब एलसीबीच्या टीमला सांगा, गांधीनगर पेठ बीड हद्दीमध्ये गांजा दारू पत्त्याचे क्लब मटका आणि जुन्या शिवनी रोड वरती एका पत्त्याचा क्लब जो की रशीद मोघ्याचा आहे. रशिद मोघ्या हा हनुमंत उगले चा खातेदार आहे आणि बार्शी नाक्यावरील सिंधी अवैधताळी विक्री हाही खातेदार हनुमंत उगलेचा आहे. मुरूम वाळू सह अनेक दोन नंबरचे खातेदार हनुमंत उगले च्या संपर्कात आहेत त्यामुळे मोडणे गरजेचे आहे त्यामुळे आपण आदेशित करावं असं या भागातील नागरिकांची मागणी आहे.

## पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये हनुमंत उगलेकडून जोरदार वसुली चालू आहे ही वसुली नेमकी कोणासाठी

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये काही महिन्यापूर्वी एका मनोरुग्ण मुलीवरती बार्शी रोडवरील एका झाडाझुडपामध्ये रात्री बाराच्या दरम्यान बलात्कार झालेली अल्पवयीन मुलगी मनोरुग्न असलेल्या नग्न अवस्थेमध्ये आढळून आली होती. संबंधित मुली वरती अत्याचार झाल्याच्या घटनास्थळी असणाऱ्या लोकांनी पाहिलं आणि व्हिडिओ तयार झाले ते व्हिडिओ सोशल मीडियावरती व्हायरल झाले. परंतु त्या ठिकाणी डायल ११२ वरती कॉल केल्यानंतर संबंधित आरोपी व त्यांची मोटार सायकल हनुमंत उगलेसह अन्य पोलीस कर्मचारी पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले परंतु त्यांना त्या ठिकाणावर का सोडण्यात आले हे एसपींनी हनुमंत उगलेला विचारणे गरजेचे आहे. परंतु त्या ठिकाणी हनुमंत उगले आता सध्या कार्यरत आहे. पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये हनुमंत उगलेकडून जोरदार वसुली चालू आहे ही वसुली नेमकी कोणासाठी आहे. नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळामध्ये दोन नंबरचे धंदे बंद असताना सुद्धा सध्या बार्शी नाक्यावरती सिंधी ताडी दारू हातभट्टी मटकासह गांधीनगर मध्ये दारू पत्त्याचे क्लब मटका आणि गांजाची विक्री होते गांधीनगर मध्ये हनुमंत उगले दरारा आहे. हनुमंत उगले च्या आशीर्वादाने आज सुद्धा रशिद उर्फ मोघ्याचा क्लब राजरोषपणे चालू आहे.

## अजित पवार उद्या बीड दौऱ्यावर

बीड । प्रतिनिधी
राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार उद्या सोमवारी बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते जिल्हा नियोजन समितीसह इतरही बैठका घेणार आहेत. हा त्यांचा बीडचा तिसरा दौरा आहे. यावेळी ते सकाळी ८:१५ पासून बैठकाघेणार आहेत.



बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहेत.
अजित पवारांनी मागच्या दौऱ्यात जिल्हा प्रशासनातील विविध बाबींचा आढावा घेतला होता, तसेच प्रशासन गतिमान करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बीड जिल्ह्यात विमानतळ तसेच इतर बाबींसाठी अजित पवारांनी पुढाकार घेतला होता. अजित पवारांच्या नागच्या दौऱ्यानंतर बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची बदली होऊन विवेक जॉन्सन बीडचे जिल्हाधिकारी म्हणून पाहत आहेत. आता अजित पवार सोमवारी (दि.१९) बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यात ते नियोजन समितीची बैठक, खरीप हंगाम पूर्व आढावा बैठक आणि विकास योजनांची आढावा बैठक घेणार आहेत.
विशेष म्हणजे अजित पवारांचा हा बैठकांचा सपाटा सकाळी ८.१५ वाजताच सुरु होणार आहे. या दौऱ्यात अजित पवार काही राजकीय कार्यक्रम घेणार का हे मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही तसेच मागील बैठकीत बीड येथे सीआयआयटीची स्थापन करण्याचे जाहीर केले होते.

## चौसाळयातील जानकी लॉज, बियरबारचा परवाना रद्द करावा

### जिल्हाधिकारी व बीड पोलीस अधीक्षकांना नागरिकांनी केली निवेदनातून मागणी

बीड । प्रतिनिधी
सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्ग बीड तालुक्यातील चौसाळा येथील राजरोस, दिवसाढवळ्या वेश्या व्यवसाय चालत असल्याने चौसाळा येथील जानकी लॉज, बीअरबारचा परवाना रद्द करण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदनातून केली आहे.
सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ (जुना क्र.२११) वर चौसाळा ता. बीड हद्दीत (पो.स्टे. नेकनुर ता. बीड) दशरथ तानाजी थोरात रा.चौसाळा ता.बीड यांचे मालकीचे जानकी लॉज, बिअरबार रेस्टॉरंट चौसाळा यामध्ये गेल्या राजरोस पणे वेश्या व्यवसाय चालु आहे. ही बाब पोलीस स्टेशन नेकनुर येथील सर्व अधिकारी कर्मचारी यांना माहीत असून देखील कारवाई केली जात नाही विशेष म्हणजे चौसाळा पोलीस चौकी या हॉटेल पासुन फक्त २०० मिटर अंतरावर आहे.
सदर जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग, चौसाळा ता. बीड येथे वेश्या व्यवसाय चालु असल्याने मा.श्री. पंकज कुमावत साहेब (खझड) यांनी धाड धाकुन तेथील पिडीत महिलांची सुटका केली व जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग, चौसाळा चे मालक व चालक श्री. दशरथ तानाजी थोरात रा.चौसाळा यांचे विरुद्ध पो.स्टे. नेकनुर येथे गु.र.न.०२१४/२०२३ दि.२९/०७/२०२३ अन्वये स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम-१९५६ (सिट अधिनियम पुननिर्मीत) चे कलम ३, ४, ५ व ७ नुसार गुन्हा नोंद होवुन त्यांना अटक झालेली असुन तो सध्या जामीनावर सुटलेला आहे. तसेच मा. ५ वे न्याय दंडाधिकारी बीड यांचे न्यायालयात रेग्यलर क्रमीनल केस क्र. ७६०/२०२३ ने प्रकरण चालु आहे.
२ तसेच सदर जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग, चौसाळा वर नुकतीच मा. श्रीमती वर्षा व्हगाडे पोलिस निरीक्षक अनैतीक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, पोलिस अधिक्षक कार्यालय बीड यांनी पुन्हा धाड टाकुन परराज्यातील पिडीत महिलांची सुटका केली आहे. तसेच मालक श्री. दशरथ तानाजी थोरात रा. चौसाळा याचे विरुद्ध गु.र.न.०१०२/२०२५ दि.०६/०५/२०२५ अन्वये स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम-१९५६ (सिट अधिनियम पुननिर्मीत) चे कलम ३, ४, ५ व ७ तसेच भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) २०२३ चे कलम १४३(२), १४३(३) नुसार गुन्हा नोंद असुन बार मालक फरार आहे.
जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग, चौसाळा चे मालक श्री. दशरथ तानाजी थोरात -रा.चौसाळा यांचे विरुद्ध पो.स्टे. नेकनूर येथे गु.र.न. १४६/२०१९ नुसार भा.द.वि.३५३ नुसार गुन्हा नोंद असुन हायपर प्रकरण ३ रे अतिरीक्त न्यायधिश बीड यांचे समोर सेशन केस क्र.२५७/२०१९ नुसार चालु आहे. थोरात कुटुंब हे गुंड प्रवृत्तीचे कुटुंब असुन त्यांचे दारु चे व इतर तत्सम दोन नंबरचे धंदे आहेत. दशरथ तानाजी थोरात याचे विरुद्ध जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग, चौसाळा येथे राजरोस पणे वेश्या व्यवसाय चालवत असल्याने विविध गुन्हे नोंद आहेत.
जानकी लॉज व बियरबार मध्ये राजरोस पणे दिवसा रात्री वेश्या व्यवसाय चालु असुन तेथे राज्यातील तसेच परराज्यातील महिला मुली आणून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय केला जातो. या लॉच्या काही अंतरावर एक महाविद्यालय असून विद्यार्थी व विद्यार्थिनीवर याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे चौसाळा परिसराची नाहक बदनामी होत आहे.या करीता जानकी बिअरबार रेस्टॉरंट अँड लॉजिंग चा परवाना कायमस्वरुपी रद्द करुन सदर इमारत सिल करण्यात यावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी निवेदनातून बीड पोलीस अधीक्षक यांना दिली आहे.बीड शहर व परिसरात देखील अनेक लॉजवर वेश्या व्यवसाय तसेच अल्पवयीन जोडताना रूम दिल्या जात आहेत त्या लॉजवर पोलीस अधीक्षकांनी कारवाई करून कायमस्वरूपी परवाना रद्द करण्यात यावा करण्यात यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# परळीमध्ये पुन्हा स्व.संतोष देशमुख होता होता राहिला

परळी वै. । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील लिंबोटा गावातील व गोपीनाथगड तालुका परळी येथील मराठासेवक नारायण दिवटे पाटील यांचा मुलगा आज जलालपूर येथे अखंड हरिनाम सप्ताह ची सांगता असल्यामुळे महाप्रसाद घेण्यासाठी गेला असता त्या भागात टोकवाडीतील नव्याने उदयास आलेली मुंडे गँग नामक काही तरुण गेले आणि अनेक दिवसापासून त्रास देण्याच्या मानसिकतेत असल्यामुळेच गावकऱ्यांनी काल त्यांना समज देत असताना हा गुंड प्रवृत्तीचे तरुणांनी तिथे कोयत्याने व हातात लाकडी काठ्या ने हानमार करीत आणताना चे फोटो दिसत आहेत. व दहशत माजविण्याचा प्रयत्न करीत आहेत.



यावेळेस त्या गावातील तरुणास कोयता लागला होता यावेळेस सदरील शिवराज नामक तरुण महाप्रसादासाठी गेलेला होता व तिथे उपस्थित होता या तरुणा काही वेळाने या आगोधर पहिला आणि ह्याचा राग मनात धरून काही वेळाने शिवराज दिवटे नामक तरुणास रिलायन्स पेट्रोल पंप थर्मल पॉवर स्टेशन येथून उचलून नेऊन टोकवाडीतील रत्नेश्वर मंदिर येथील डोंगरावर झाडीत रिंगण करून मारहाण करताना व्हिडिओ केला.

सदरील तरुण रत्नेश्वर मंदिरे येथे लग्न असल्यामुळे रहदारी होती. व येथे आरडा वरण व रडण्याचा आवाज आल्याने आवाज का येतो असे पाहण्यासाठी गेले असता हा प्रकार उघड पडला व या तरुणाचा स्व.संतोष अण्णा देशमुख घडता घडता एका तरुणास दाह ते बारा जणांच्या राहिला टोळक्याने घेऊन अक्षरश:रक्तबंबळ केले.

याप्रकरणी पोलिसांनी तत्काल हालचाल करत सात जणांना बेड्या ठोकल्या आहेत. परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात या मारहाण करणाऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचे नावे नंबर खालील प्रमाणे आहेत. समाधान मुंडे (रा. टोकवाडी), रोहित मुंडे रा. डाबी, आदित्य गीते (रा.नदागौळ), ऋषिकेश गिरी (रा.कवाडी), प्रशांत कांबळे (रा.परळी वै.), सन्मित्र शिंदे (रा.शिवाजी नगर परळी), सोमित्र गोरे (रा.ज्यार अक्का परळी), रोहन बागलकर (रा.परळी), सुरज मुंडे (रा.टोकवाडी), स्वराज गीते (रा.टोकवाडी) आणि उत्तर दहा अज्ञात इसम या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे ही आमाणूस महाराण परळीतील कतीत मुंडे गँगचा मोरक्या समाधान मुंडे आणि त्यांच्या गुंडाने केलेली इतकेच नव्हे तर क्रूरक्रमाने पीडित तरुणाला अक्षरश:पाया पडून माफी मागण्यासभाग पाडले. ज्यांच्या एका व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने एकच संतापजनक वातावरण निर्माण झाले. या भयानक मारहाणीतून थोडक्यात बचावलेला शिवराज दिवटे यांनी आपल्यावर कोसळलेल्या भयानक प्रसंगाचे वर्णन केले आहे. ते ऐकून कोणाच्याही काळजाचा ठोका चुकेल.

या घटनेमुळे परळी परिसरात एकच खळबळ माजली असून नागरिकांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. एका निष्पाप तरुणाला केवळ येत्या भांडणाची कोणताही संबंध नसताना अशाप्रकारे मारहाण करणे आणि त्याला जीवे मारण्याची धमकी देणे हे अत्यंत ग्रहणास्पद आणि चिंताजनक आहे. आता पोलीस याप्रकरणी काय कठोर पावले उचलतात. याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे. नागरिकांमध्ये या गाव गुंडावर त्वरित आणि कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. बीड जिल्ह्याचे एसपी नवनीत कॉवत यांनी या घटनेवर तात्काळ लक्ष देऊन या गुंडांना कठोरात कठोर (मोकोका) अंतर्गत कारवाई करण्यात यावी ही भयभीयत झालेल्या नागरिकांनी मागणी केली आहे.



# नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या औषध आणि गोळ्या विकणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

## बीड शहर पोलिसांची कारवाई चार आरोपी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

नशेच्या गोळया व औषधे दिनांक १६/०५/२०२५ रोजी रात्री बीड शहर पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, बीड शहरातील हाफीज गल्ली, जुना बाजार येथे अनधिकृतपणे चोरीच्या मार्गान विक्री करण्यात येत आहेत. त्यावरुन दिनांक १६/०५/२०२५ रात्री १९.०० वा. च्या सुमारास वरिष्ठांच्या परवानगीने व मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीसांनी पंच साक्षीदार तसेच फार्मासिस्ट यांच्यासह हाफीज गल्ली, जुना बाजार बीड येथे मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी एका जुन्या वाडयात छापा मारला असता तेथील घरातून चार इसम बाहेर येतांना दिसले.

त्यांची नावे फैजानखान अस्लमखान पठाण, सोहेलखान युसुफखान पठाण, दोन्ही रा. हाफीजगल्ली, जुना बाजार थीड, शोएबखान ताजुद्दीनखान, रा. हत्तीखाना बीड, ४) शेख फिरोज शेख सादेक, रा. गिराम गल्ली कारंजा, बीड अशी असून त्यांना पोलीस निरीक्षक श्री शितलकुमार बल्लाळ यांनी स्वत:चा परिचय देऊन तसेच योग्य ती कायदेशिर प्रक्रीया पुर्ण करुन सदर इसमांची अंगझडती घेतली असता त्यांच्या पँटच्या शिखांमध्ये नेशसाठी वापरण्यात येणाऱ्या औषधांच्या बाटल्या तसेच गोळया मिळून आल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री शितलकुमार बल्लाळ यांनी आरोपीतांना सदर घर कोणाचे आहे व तुम्ही सदरचे औषध व गोळया कुठे घेऊन चाललात असे विचारले असता सदरचे घर आजमखान गुलमोहम्मद खान, रा. हाफीज गल्ली, जुनाबाजार बीड यांचे असल्याचे सांगुन नमुद गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळयांची पाकीटे आम्ही लोकांना नशा करण्यासाठी विकतो असे सांगीतले.

तसेच सदर घरात जाऊन आरोपीतांनी एक जांभळ्या रंगाची गोणी पोलीसांना दाखविली. त्यामध्ये देखील गुंगीकारक औषधाच्या बाटल्या व गोळयांची पाकीटे तसेच रोख रक्कम मिळून आली. सदर सर्व औषधाच्या बाटल्या व गोळयांची पाकीटे हि फार्मासिस्टच्या मदतीने तपासली असता सदर औषध व गोळयांचे जास्त प्रमाणात सेवन केल्यास त्याचा नशेसाठी वापर होऊ शकतो असे सांगीतले. नमुद छापा कारवाईमध्ये खालील वर्णनाचा एकुण २,५४,०९७ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

# मारहाणीच्या निषेधार्थ रास्तारोको आंदोलन

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील लिंबोटा येथील युवक शिवराज दिवटे यास २० जणांनी बेदम मारहाण केली. या घटनेच्या निषेधार्थ आज रविवारी सकाळी ८ वाजता ग्रामस्थांनी रस्तारोको आंदोलन सुरु केले. यामुळे परळी–बीड महामार्गावर वाहतूक ठप्प झाली आहे. मारहाण करणाऱ्या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.



१६ मे रोजी परळी शहरातील जलालपुर येथील सप्ताहात युवक शिवराज दिवटे याच्याशी काही लोकांचे भांडण झाले होते. त्यानंतर रत्नेश्वर टेकडीवर २० जणांनी दिवटे याला बेदम मारहाण केली. यामध्ये दिवटे जखमी झाला. या प्रकरणी पोलिसांनी ७ जणांना ताब्यात घेतले असून त्यातील ५ जणांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. यातील दोन जण अल्पवयीन असल्यामुळे त्यांना बालसुधारगृहात पाठवण्यात आले. या मारहाणीच्या घटनेमुळे स्थानिक ग्रामस्थ संतप्त झाले असून त्यांनी पोलिसांवर गुंडगिरीला आळा घालण्याची मागणी केली आहे. यासाठी उद्या सोमवार (दि. १९) परळी बंदची हाक देण्यात आली आहे.



# उद्या धाराशिव येथे मा.बाळासाहेब आंबेडकर यांचा कार्यकर्ता संवाद मेळावा : डॉ संजय नाकलगावकर

बीड । प्रतिनिधी

आगामी निवडणूका नियोजन संदर्भात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.बाळासाहेब आंबेडकर यांचा धाराशिव येथे संवाद मेळावा येत्या २० मे रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे. तरी वंचित बहुजन आघाडीचे आजी व माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवा आघाडी, कामगार आघाडी, सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हानं मा तालुकाध्यक्ष डॉ संजय नाकलगावकर यांनी प्रसिध्दी पत्रकात केले आहे.

# बीड च्या मोंढ्यात पोलिसांनी लाखो रुपयांची रत्नाछाप तंबाखू पकडली

बीड । प्रतिनिधी

दिनांक १६/०५/२०२४ रोजी पेठ बीड पोलीस ठाणे येथील सपोनि सुदाम धर्मराज शिरसाट यांना गुप्त बातमीदारामार्फत जुना मोंढा बीड येथे पारले जी. गोडाऊन समोर पारस चंदुलालजी यांच्या गोडाऊनमध्ये प्रिमियम रत्नाछ तंबाखू नं. ३००० व रत्नाछाप तंबाखू नं. ३०० असे असल्याची माहिती मिळाल्याने पो.स्टे. पेठबीड येथील पोलीस निरीक्षक मुदीराज, सपोनि. श्री सुदाम शिरसाट, पोह/गणेश धनवडे तसेच एटीबी, शाखा बीड येथील श्रेणी पोउपनि. श्री सुर्यकांत गुळभिले, स.पो. श्री अशोक नरवडे, स.पो.श्री राजेभाऊ वंजारे, पोह/खमर शेख अशांनी सदर ठिकाणी जाऊन छापा मारक असता त्या ठिकाणी ५,२९,६००/–रुपये किंमतीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत प्रिमियम रत्नाछाप तंबाखू ३००० व रत्नाछाप तंबाखू नं. ३०० असे दोन्ही एकत्रित करुन ज्यामुळे मणूष्याचे मानवी जिवितास धोका पोहचेल अश पदार्थाची अवैधरित्या, विनापरवाना बेकायदेशिर रित्त्या स्वत:चे आर्थीक फायद्यासाठी चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने साटऊन ठेवलेला मिळून आला. त्यावरुन इसम नामे पारस चंदूलालजी बेदमुथा, वय ५५ वर्षे, रा. गुजराथी कॉलनी, जालना रोड बीड यास ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाई मा. श्री नवनीत कॉंवत, पोलीस अधिक्षक बीड, मा. श्री सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधिक्षक बी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे पेठबीड येथील पोलीस निरीक्षक श्री अशोक मुदीराज, सपोनि. श्री सुदाम शिरसाट, पोह/गणेश धनवडे तसेच एटीबी. शाखा बीड येथील श्रेणी पोउपनि, श्री सुर्यकांत गुळभिले, सफी/श्री अशोक नरवडे, सफौ/राजेभाऊ बंजारे, पोह/ खमर शेख अशांनी पार पाडली.

मटका जुगारावरही कारवाई

दिनांक १६/०५/२०२५ रोजी पोलीस ठाणे पेठ बीड येथील प्रभारी अधिकारी अशोक मुदीराज यांना माहिक मिळाली की, एका हॉटेलमध्ये काही इसम कल्याण नावाचा मटका जुगार खेळत आहेत, अशी माहिती मिळाल्यावरुन पोलिस निरीक्षक श्री अशोक मुदीराज, सफौ/१३६ पवार, पोह/१६३१ सानप, पोशि/१००३ इनामदार व चालक पोह/६०८ असद यांनी हॉटेलमध्ये जाऊन छापा मारुन खात्री केली असता तेथे मटका जुगार खेळणारे इसम पळून गेले. तसेच मटका जुगार खेळविणारा इसम जागीच मिळून आला.

त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शाह चंद्रभान म्हस्के, असे सांगीतले. सदर इसमाची झडती घेतली असता त्याच्याकडे मटका जुगार खेळण्याचे साहित्य व रोख रक्क असे एकुण १२,७५० /– रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला.

पान १ वरून...

## गांधीनगर में रशीद मोघ्या का क्लब...

गुन्हा दाखल करतात परंतु हनुमंत उगले सध्या पण पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीमध्ये गांधीनगर मध्ये जुना शिवनी रोड ज्याला की दोन रस्ते आहेत अशा ठिकाणी असलेला रशीद मोघ्याचा क्लब हनुमंत उगले च्या आशीर्वादाने चालत असल्याचे बोलले जात आहे. सध्याच्या परिस्थितीत पाहिले तर एस पी साहेब आपल्याला आज रोजी आपल्या व्हाट्सअप ला संबंधित क्लब ठिकाणी चालू आहे त्या ठिकाणचे व्हाट्सअप वरती लोकेशन टाकलेले आहे त्यावरती आपण रेड करून सत्य परिस्थिती पाहणी करावी व आजूबाजूच्या लोकांना विचारणे करावी. आज सुद्धा दिवसभरात पत्त्याचा क्लब राजवटपणे चालू आहे तर पेपर पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील कर्मचाऱ्यांची गांधीनगर च्या दारू गुटखा मटका या ठिकाणी गल्लीबोळा मध्ये घुसून रेड करण्याची डेरिंग होत नाही का असावा आता नागरिकांमधून होत आहे.

# उत्तम हजारे - ग्रामीण पत्रकारितेचा आधारवड

त्यांनी स्वत: संघर्ष करून, बहुजन चळवळीतल्या संघर्षाला बातमीच्या माध्यमातून आकार दिलाय. त्यांच्या जगण्याच्या अभिनव पद्धतीचा हेवा वाटावा, एवढी ती वैखरीची बाट बिकट होती. त्या, बाटेला तुडवून त्यांनी बातमीच्या पानावर स्वत:ला झोकून दिले. एका लहानशा गाव खेड्यातून आलेल्या या स्थितप्रज्ञ माणसाने जिल्हा पातळीवर विविध वृत्तपत्राचा बातमीदार म्हणून काम केले. शहरातील माणसांना आपलेसे करून, पॉझिटिव पत्रकारिता केली. समाजाच्या भल्यासाठी धडपडणाऱ्यांना शब्दांचे बळ दिले. बाबासाहेबांनी मुकनायकाच्या माध्यमातून लोक जागृती केली. समाजला सजग केले. याच पाऊलवाटेने जाऊन, उत्तम हजारे यांनी बाबांच्या लेखणीचा आधार आणि आदर्श घेतला. त्यांच्या पत्रकारितेला पस्तीस वर्ष झाली. वामनमुर्ती असलेल्या, या पत्रकार मित्राने ग्रामीण भागातील पत्रकारांना उभे करण्यासाठी पाठबळ दिले आहे. त्यांना मार्गदर्शन केले आहे. कसलीही आदळआपट न करता, संयम ठेवून काम केले आहे. त्यांच्या वाणीतल्या गोडव्याने, त्यांच्याच कर्तृत्वावर उत्तम अशी मोहर उमटली आहे. ग्रामीण पत्रकारितेचा आधारवड म्हणून ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांच्या यशस्वी प्रवासाने मराठवाड्यातल्या जर्नालिझम हिस्ट्रीत एक सोनेरी पान तयार झाले आहे. एक चांगला मार्गदर्शक, ज्येष्ठ पत्रकार म्हणून उत्तम हजारे यांची कारकिर्द उर्जा देणारी राहीली आहे. त्यांच्या विषयी असलेल्या प्रेम भावनेतून, त्यांच्याच साडेतीन दशकाच्या कार्य कर्तृत्वाचा घेतलेला हा वेध, हे शब्द पुष्प..!

उत्तम हजारे बीडचे ज्येष्ठ पत्रकार आहेत. सिरसमार्ग ता. गेवराई जि. बीड चे भूमिपुत्र आहेत. सिंदफणा नदीच्या काठावर त्यांच बालपण गेलय. आई–वडीलांचे काबाडकष्ट, गरीबीचे सहन केलेले चटके त्यांनी पाहिलेत. गावातच, प्राथमिक माध्यमिक शिक्षणाचे धडे गिरवलेत. सिंदफणेच्या अंगा खांद्यावर खेळून बीड सारख्या मोठ्या शहरात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. कॉलेजात असतानाच, त्यांना साहित्याची आवड निर्माण झाली. ते कविता करायचे, समकालीन विषयावर लिहायचा प्रयत्न करायचे. बलभीम महाविद्यालयाच्या परिसराने त्यांच्या उत्तम संस्कार केलेत. उत्तम हजारे निर्गी पत्रकार आहेत.

बातमीच्या धर्माला जागून काम करणारे आहेत. जिथे काम करायची मिळाली, त्या ठिकाणी इमानदारीने काम केले. आड पडदा न ठेवता बातमीला शाश्वत आकार देण्याची भूमिका पार पाडली. बहुजन समाजातल्या तरूण पत्रकारांना मार्गदर्शन केले आहे. जे त्यांच्या संपर्कात आले. अशा, सर्व पत्रकारांना त्यांनी बातमी मूल्य शिकवले आहे.

दै. लोकशा सारख्या मोठ्या वृत्तपत्रात मोठी जबाबदारी मिळाली आहे. ते तिथे रमलेत. संपादकाचा विश्वास मिळवला आहे. एवढेच नाही, बंब कुटुंबातल्या परिवारात स्वत:ची विश्वासार्हता निर्माण केली आहे. वाणीवर ताबा असलेले ते पत्रकार आहेत. जिभेचा मणका ताठ आहे. म्हणूनच, इथपर्यंत आलेत. सोपी गोष्ट नाही.

नबलाई म्हणजे, पती, पत्नी आणि त्यांची दोन्ही मुले एकाच महाविद्यालयात शिकली आहेत. ज्यांनी दारिद्र्य पाहिले, अनुभवले, त्या हजारे परिवाराला सुखाचे दिवस पाहायला मिळालेत. द सिक्रेट पुस्तकातला रॉन्डा नावाचा विचारवंत सांगतो की, तुमचा भुतकाळ, तुमच्या वर्तमान काळात संचित म्हणून उभा राहतो. उत्तम हजारे यांनी हालअपेष्टा सहन करून, आनंदाने पत्रकारिता केली. वैखरीच्या वाटा तुडवून, कुटुंबाचा गाडा पती–पत्नीने चालवला. त्यांची पत्नी मोची पिंपळगाव ता. माजलगाव जि.बीड येथील आहे. त्या उच्चशिक्षित आहेत. प्रतिकूल परिस्थितीत कुटुंब चालवले. मुलांना शैक्षणिक प्रवाहात मार्गदर्शन केले. मुले मोठी झाली. एक मुलगा डॉक्टर झालाय. मुलगी उच्च शिक्षण घेत आहे.



उत्तमराव सांगतात, बदल हवा, या धाटणीची पत्रकारिता करायला हवी. पत्रकारांनी, सर्वार्थाने बदलाचा साक्षीदार व्हावे, समाजात सकारात्मक बीजारोपण करीत राहावे. बातमीच्या माध्यमातून वंचित घटकाच्या मागे उभे राहावे, असा आग्रह त्यांनी नेहमीच ठेवला आहे. त्यांच्या लाडक्या लेकी बद्दल ची कहाणी ऐकून माणसं आणखी त्यांच्या प्रेमात पडतात. दै. पुढारीचे जिल्हा पत्रकार म्हणून कार्यरत होते. त्याच दरम्यान, परळी जि. बीड येथील स्त्री–भ्रूण हत्या प्रकरण बाहेर आल्याने, महाराष्ट्र हादरला होता. गर्भातच मुलींचा जीव घेतला जातो. त्यामुळेच, बीड जिल्ह्यात मुलींचा जन्मदर कमी होत असल्याचे दिसून आले. संवेदनशील माणसांना गहिवर आला. चीड निर्माण झाली. त्याच विषयाच्या माध्यमातून, उत्तमरावांनी, हा गंभीर विषय; बातीमीच्या माध्यमातून आणखीन लावून धरला. समाजात चर्चा घडवून आणली. दै. पुढारी सारख्या राज्य पातळीवरच्या वृत्तपत्रात, स्त्री भ्रूण हत्या प्रकरण पानभर छापून आणले. महिनाभर वृत्त मालिका सुरू ठेवून, वाचकांना या प्रश्नावर विचार करायला भाग पाडले. मुलगीच खरा आधार असताना, गर्भातच मुलींचा जीव घेतला जातोय. उत्तम हजारे, या प्रकरणाने आतून अंतर्मुख होत गेले. एक तरी मुलगी व्हावी, अशी मनोमन इच्छा व्यक्त केली. इश्वराने त्यांची इच्छा पूर्ण केली. त्यांना एक गोड मुलगी आहे. लाडाच्या लेकीवर त्यांचा भलता जीव आहे.

उत्तम हजारे कुटुंबवत्सल आहेत. संवेदनशील पत्रकार आहेत. मितभाषी आहेत. मोजकेच बोलतात. समाजाला उपयोगी पडणारे विषय लावून धरतात. नव्या पत्रकारांना विषय सुचवतात. प्रदीर्घ अनुभव गाठीशी आहे. एक भूमिपुत्र म्हणून, हजारे यांनी गेवराई जि. बीड च्या पत्रकारांशी कायम संवाद ठेवला. या परिसरातील प्रश्नांना ऐरणीवर आणले. सामाजिक, राजकीय चळवळीत भूमिका पार पाडली. लोकशाहीला नेहमीच पाठिंबा दिला. गोरगरीबांचा कैवार घेऊन, त्यांचे प्रश्न सरकार दरबारी मांडले, हेतू न ठेवता पत्रकारिता धर्म सांभाळून काम करणारे उत्तमराब, अनेका पक्ष संघटनेतल्या कार्यकर्त्यांचे चांगले मित्र म्हणून वावरलेत.

दै. नवाकाळ, पुढारी, पुण्यनगरी, झुंजार नेता, सम्राट, दै. लोकाशा आदी दैनिकांच्या पानावर स्वत:ची ओळख उभी केली, उत्तम हजारे यांना अग्रलेखाचे बादशहा निळूभाऊ खाडिलकर, पदमश्री डॉ प्रतापसिंह जाधव, मुरलीधर बाबा शिंगोटे, मोतीरामजी वरपे, –बचनराव कांबळे सारख्या प्रतिभावान माणसांचा सहवास लाभला. छापलेले सत्य असते. यावर, वाचकांचा आजही विश्वास; त्या विश्वासाला पात्र राहता आले. हे, उत्तम हजारे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष म्हणावे लागेल, तीन – साडेतीन दशकाचा, हेवा वाटावा असा त्यांचा प्रवास राहीला आहे. एवढ्या मोठ्या कालखंडात त्यांनी विशेष लेख, वृत्त विशेष, संपादकीय पानावरचे लेख, कथा, कविता, वृत मालिका, बातमीच्या मागे दडलेली बातमी, असे असंख्य विषय पुढे आणले. बातमीचा शेवट करेपर्यंत ते थांबले नाहीत. समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत बातमीला घेऊन गेले. खर म्हणजे, ते मवाळ वादी आहेत. मात्र, स्त्री–भ्रूण हत्या प्रकरणात त्यांनी केलेली बातमीदारी, त्या विषयावर केलेले चिंतन, पिच्छा, पाठपुरावा नव्या पिढीतल्या पत्रकारांसाठी मार्गदर्शक पान आहे. तुम्ही पत्रकार आहात. म्हणजे, नेहमीच आक्रमक असावे. याची गरज नसते. हे उत्तमरावांनी दाखवून दिले. स्थितप्रज्ञ राहून ही तुम्ही तुमच्या ध्येयापर्यंत जाऊ शकता. याचे उत्तम उदाहरण म्हणजे उत्तम हजारे..! अल्वीन टॉपलर म्हणायचे, पत्रकारांनी समाजाची यंत्र शक्ती म्हणून काम करावे. या अर्थाने, ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांच्या पत्रकारितेकडे पाहता येईल. मला ही, त्यांचा सहवास लाभला. अगदीच प्रतिकूल काळात त्यांनी मार्गदर्शन केले. चार हिताच्या गोष्टी सांगितल्या, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित झालेले उत्तमराव, आपल्या अंगभूत गुणांच्या बळावर मोठे झाले. विचाराचा वारसा जोपासून चालत राहीले. विचाराची श्रीमंती लाभलेल्या, या भल्या माणसाने आर्थिक परिस्थितीशी दोन हात केलेत. स्वाभिमानाची पत्रकारिता केली. शब्दांची श्रीमंती खिशात घेऊन, बातमीची मुशाफिरी करणारे असंख्य पत्रकार बा–महाराष्ट्राने अंगाखांद्यावर जपले आहेत. त्या मध्ये उत्तम हजारे यांच्या सारख्या बहजन घटकातल्या पत्रकाराचा उल्लेख होतो म्हणजे, मोठी गोष्ट आहे. त्यांनी, मनाला समाधान लाभेल, अशी पत्रकारिता केली. पत्रकारितेने त्यांच्या प्रतिभेला उंचीवर नेले आहे. बातमीच्या माध्यमातून जीवनसत्व पेरलीत.

त्यांच्या कर्तृत्वाचा मुला–बाळांना आशीर्वाद लाभला. मुलगा डॉक्टर झालाय. एक वेळ, उत्तमरावांनी एक वेळ आर्थिक अडचणीशी सामना केला. डॉक्टर झालेल्या मुलाने, पंच्याहत्तर हजार एवढ्या मोठ्या रक्कमेचा पहिला पगार समाजाच्या पायावर ठेवला, या बांधिलकीने हजारेंच्या कुटुंबाला कर्तृत्वाचे झुंबर लागलेत. पैसा नसतो तेव्हा समाजाचा आधार घेतला जातो. हाती पैसा आडका आला की, समाजाला विसरणारी पिढी सुद्धा अवतीभोवती दिसते. मात्र, हजारे कुटुंब अपवाद ठरले. समाजाचे आपण देणं लागतो. ही जाणीव ठेवून, नवा आदर्श ठेवणारे उत्तमराव हजारे आणखी मोठे झालेत. उत्तमरावांनी, पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत असताना, पुरोगामीत्व जपले आहे. सकल जीवनाला आकार देणारी पत्रकारिता केली आहे. त्यामुळेच, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला प्रतिष्ठा लाभली आहे. त्या प्रतिमा आणि प्रतिभेला जपा. या पुढे ही, ते लोकजागृती करून, कर्तव्य पार पाडत रहा. अशी अपेक्षा आहे. त्याच धाटणीतला तुमचा स्वभाव आहे. कवी हरिवंशराय बच्चन यांनी लिहिलय, बैठ जाता हूं मिट्टी प्रत्येक अक्सर, क्योंकि मुझे अपनी औकात अच्छी लगते है...!

**सुभाष सुतार, पत्रकार,**
**गेवराई–बीड**

# घाटा पिंपरी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## श्री संत तुकाराम महाराज जीवन चरित्र कथा ज्ञान यज्ञ : शनिवारी ह.भ.प. इंदुरीकर यांचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

श्री संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठ गमन होऊन ३७५ वर्षे झाली आहेत. त्यानिमित्ताने संत तुकोबारायाचे जीवन चरित्र व गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी येथे करण्यात आले आहे. रविवार दिनांक १८ /५/२०२५ ते रविवार दिनांक २५/५/२०२५ या कालावधीत हा भव्यदिव्य अखंड हरिनाम सप्ताह संपन्न होत आहे.

या सात दिवस चालणाऱ्या गाथा पारायण सोहळ्याला कथा प्रवक्ते म्हणून श्री ह भ प रामायणाचार्य संतोष महाराज मोरे (श्री क्षेत्र आळंदी देवाची) यांच्या सुमधुरवाणीतून सात दिवस कथा चालणार आहे तर दैनंदिन कार्यक्रमांमध्ये पहाटे चार ते पाच काकडा, भजन सकाळी सात ते आठ विष्णुसहस्रनाम, सकाळी आठ ते ११ गाथा पारायण, सकाळी ११ ते १२ गाथा भजन, दुपारी बारा ते एक अन्नप्रसाद, दुपारी तीन ते पाच श्री संत तुकाराम महाराज जीवन चरित्र कथा, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, सायंकाळी सहा ते आठ अन्नप्रसाद, रात्री नऊ ते ११



हरिकीर्तन, नंतर जागर या सात दिवस चालणाऱ्या सप्ताह मध्ये महाराष्ट्रातील प्रसिद्ध अशा कीर्तनकारांचे कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली आहे त्यामध्ये रविवार दिनांक १८ /५/२०२५ रोजी ह भ प गणेश महाराज पाटील (श्री क्षेत्र पंढरपूर) सोमवार १९/५/२०२५ ह भ प सुधाकर महाराज वाघ( श्रीक्षेत्र पैठण) मंगळवार २०/५/२०२५ ह भ प सोमीनाथ महाराज पाटील (श्री क्षेत्र आळंदी देवाची) बुधवार २१ /५/२०२५ ह भ प शहाजी महाराज मोरे (श्री शेत्र गाथा मंदिर देहू ) गुरुवार २५/५/२०२५ ह भ प संग्राम बापू महाराज भंडारे (श्री क्षेत्र आळंदी देवाची) शुक्रवार २३ /५/२०२५ स्वरभूषण कृष्णा महाराज राऊत (श्री शेत्र गेवराई जिल्हा बीड) आणि शुक्रवार रोजी सकाळी ११ ते १ राष्ट्रीय धर्माचार्य समाज प्रबोधनकार ह भ प निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन होईल व शनिवार २४ ५ २०२५ ह भ प रामायणाच्या श्रीनिवास महाराज घुगे (श्री शेत्र आळंदी देवाची) आणि रविवार दिनांक २५/ ५/२०२५ रोजी सकाळी सात ते दहा या वेळेत अभंग गाथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी मदन महाराजांच्या प्रतिमेची व गुरुवर्य व मार्गदर्शक श्री ह भ प बबन महाराज बहिरवाल यांची टाळ मृदंग डोल लेझीम व हलगी पथकास भव्य मिरवणूक होईल तरी परिसरातील ग्रामस्थांनी या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आव्हान घाटा पिंपरी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# भगवानगडामार्फत मंदिरावरील पुन्हा कळस बसवला

## कोठारबन येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नामदेव महाराज शास्त्रींचं गावकऱ्यांकडून स्वागत

बीड । प्रतिनिधी



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोठारबन येथील सप्ताह पार पडला. वडवणी तालुक्यातील एकमेव हेच ते गाव आहे. या गावानं अखंड हरिनाम सप्ताह झाल्यानंतर, भगवानगड येथील राम मंदिरासाठी भगवानगड ट्रस्टसाठी कोटी रुपयांच्या पुढे निधी दिला. याच गावात खूप मोठा राष्ट्रसंत भगवान बाबा यांचा फिरता नारळी सप्ताह पार पडला होता. आणि त्यानंतर एक कोटी रुपये गावकऱ्यांनी भगवानगड साठी देणगी केली होती. त्यानंतर सुरू झालेला हा अखंड हरिनाम सप्ताह वर्ष तिसरे. यावर्षी पार पडला व त्याचे काल काल्याचे किर्तन ह भ प शास्त्री महाराज यांच्या नेतृत्वाखाली झाले.

ह भ प नामदेव महाराज शास्त्रींवर व भगवानगडावर अत्यंत प्रेम करणारा गाव कोठारबन. या गावकऱ्यांनी वडवणी ते कोठारबन भव्य दिव्य रॅली काढून, वडवणीत मिरवणूक काढून कोठारबनपर्यंत नामदेव महाराज शास्त्री यांची मिरवणूक काढण्यात आली व त्यांचं गावकऱ्यांनी जंगी स्वागत केलं. एक कोटी रुपयाच्या पुढं देणगी जमा केली होती, देणगी काल शास्त्रीकडे गावकऱ्यांकडून देण्यात आली. आणि काही दिवसांपूर्वी कोठारबन येथे असणाऱ्या राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मंदिरावरील कळस चोरीला गेला होता. तो कळस भगवानगड ट्रस्टी यांच्याकडून शास्त्री महाराज यांच्या हस्ते कोठारबनेतील मंदिरावर पुन्हा कळस चढवण्यात आला. यावेळी हजारो गावकरी व भावी उपस्थित होते.

## अदित्य मच्छिंद्र उफाडे याचे दहावी परीक्षेत घवघवीत यश



माजलगाव । प्रतिनिधी

दहावी बोर्डाच्या परीक्षेचा १३ मे रोजी निकाल लागला असून स्वामी विवेकानंद विद्यालयातील विद्यार्थी अदित्य मच्छिंद्र उफाडे याने इयत्ता दहावी मध्ये ८६%मार्क मिळवून यश संपादन केले आहे. त्यामुळे त्याचे स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्यध्यापक श्री जगताप सर श्री करांडे सर श्री माने सर श्री थेटे सर श्री रकटे सर श्री खडके सर श्री बन्सोडे सर श्री राठोड सर यांच्या कडुन अदित्याचा पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. मित्र परीवाराकडुन कुटुंबातुन अभिनंदन व कौतुकाची थाप मिळत असून पुढील वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## धनवे गौतमी परमेश्वर या मुलीने दहावीच्या परीक्षेत ८३% गुण मिळवून घेतली यशाची भरारी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जिजामाता चौकातील नामांकित असलेल्या मॉडेल इंग्लिश स्कूलची यशाची परंपरा कायम ठवत या स्कूलची विद्यार्थिनी धनवे गौतमी परमेश्वर या मुलीने इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये तब्बल ८३% ४० पॉईंट गुण घेऊन घेतली यशाची भरारी व केले. मॉडेल इंग्लिश स्कूलचे बीड जिल्ह्यामध्ये नावलौकिक या विद्यार्थिनीचे सर्वत्र बीड शहरासह बीड जिल्ह्यामधून होत आहे.



तिने केलेल्या उत्कृष्ट अभ्यास कौशल्याच्या शैक्षणिक बुद्धिमत्तेचे कौतुक गौतमी या मुलीला भविष्यामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस दलामध्ये भरती व्हायचे आहे आणि जनतेचे संरक्षण करायचे आहे, असे तिचे स्वप्न भविष्यातले आहे म्हणून तिला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांच्या वतीने तिचे अभिनंदन करून उत्कृष्ट पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वांच्या वतीने मनस्वी शुभेच्छा मिळत आहेत.

धनवे गौतमी या मुलीचा आदर्श बीड जिल्ह्यातील इतर सर्व मुलींनी घेण्यासारखा आहे असे शुभेच्छा देणाऱ्या मान्यवरांच्या वतीने बोले जात आहे.




आमचे मित्र बीड जिल्हा विभागीय वनअधिकारी अमोल गर्कळ यांनी मुप्टा कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी जिल्हाध्यक्ष मा.शरदराव मगर, प्रवीण तरकसे, प्रकाश शिंदे, दिलीप जोगदंड, खोसे सर, मेंडके सर यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला.

## वंचित बहुजन आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी अशोक पौळ यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

जावेद कुरेशी वंचित बहुजन आघाडीच्या माजलगाव तालुका कार्यकारिणी ची निवड करण्यात आली आसुन वंचित बहुजन आघाडीच्या निरिक्षकांनी सादर केलेल्या अहवाला वरुन प्रदेश अध्यक्षा आद.रेखाताई टाकुर यांनी माजलगाव तालुक्यात भारिप बहुजन महासंघा पासुन ते वंचित बहुजन आघाडीत विविध पदावर काम करणारे निष्टावंत कार्यकर्ते अशोक पौळ यांच्या कामावर विश्वास ठेऊन त्यांची तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली.



या बरोबरच वंचित बहुजन आघाड़ीचे उपाध्यक्ष पदी संदिप फंदे, भानुदास साळवे, रामेश्वर उदमुले, अनिल साळवे तर महासचिव पदी समाधान गायकवाड, संघटक पदी रामा देशमाने, सह संघटक पदी सर्जेराव शिंदे, प्रफुल्ल डोंगरे सहसचिव पदी किशोर कांबळे यांची ही निवड करण्यात आली. अशोक पौळ व त्यांच्या कार्यकारिणी चे सर्व स्थारातुन अभिनंदन होत असुन वंचित बहुजन आघाडीच्या निष्टावंत कार्यकर्त्याला न्याय मिळाला असुन आता वंचित चे काम आता जोमाने वाढणार आसल्याचे जनसामान्यातुन बोलले जात आहे. तसेच या निवडीचे स्वागत धम्मानंद भाऊ साळवे, अंकुशराव जाधव, भारत तांगडे, लक्ष्मणराव जाधव, सचिन उजगरे, शत्रुघ्न कसबे यांनी केले.

## विनयभंगाच्या कथित आरोपातून निर्दोष मुक्तता

### आरोपीच्या वतीने अँड. सायली सुतार यांनी काम पहिले

बीड । प्रतिनिधी



घरात घुसून महिलेचा विनयभंग करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुख्य दंडाधिकारी बीड यांनी हनुमान सपकाळ यांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आरोपीच्या वतीने अँड. सायली सुतार यांनी काम पहिले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की कर्झणी ता.जि. बीड येथील हनुमान सपकाळ यांच्या विरुद्ध ग्रामीण पोलिस ठाण्यात भादवीचे कलम ३५४.४५२ व ५०६ अन्वये दि. २०/०१/२०२१ रोजी गुन्ह्याची नोंद होऊन दोषारोप मा.न्यायालयात दाखल झाले होते. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले परंतू कथीत घटना घडल्या बाबत सबळ पुरावा नसल्याच अँड सायली सुतार यांचा युक्तिवाद ग्राह्य धरण्यात येऊन हनुमान सपकाळ यांची मुख्य न्यायदंडाधिकारक्त केले. बीड यांनी दि. १६/०५/२०२५ रोजी निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणी आरोपीच्या वतीने अँड सायली सुनील सुतार यांनी काम पाहिले तर अँड किशोर टेकवाणी अँड अशोक वाघमारे यांनी सहकार्य केले.



बीड – जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर साहेब यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना फहीम इनामदार, पोलिस बॉईज असोसिएशन चे अध्यक्ष रविंद्र शिनगारे.

## शिक्षणासाठी साबेरने नेकनूरहून बीड गाठले

### सय्यद साबेर मारूफ ने दहावीत ९५.२०% गुण मिळविले

बीड । प्रतिनिधी



शहरातील प्रगती विद्यालयाचा विद्यार्थी सय्यद साबेर मारूफ ने इयत्ता दहावीत ९५.२०% गुण घेत दणदणीत यश प्राप्त केले आहे. त्याचे या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

सय्यद साबेर हा विद्यार्थी मुळचा बीड जिल्ह्यातील नेकनूर या गावचा. शिक्षणात हुशार असल्याने त्याच्या आई–वडिलांनी त्याला शिक्षणासाठी बीड शहरात पाठवले. येथे त्याने प्रगती विद्यालयात माध्यमिक शिक्षणात उंच भरारी घेतली. याचाच परिपाक म्हणून नुकताच जाहिर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात त्याला ९५.२०% गुण मिळाले. यामुळे साबेर सह संपूर्ण सय्यद कुटुंबीयांचे अभिनंदन होत आहे. तसेच साबेर ने मिळविलेल्या या यशामुळे प्रगती विद्यालयाचे मुख्याध्यापक गोपाळघरे, त्याचे वर्गशिक्षक बी.एम.सानप यांच्यासह सय्यद मोईनोद्दीन (दादा), सय्यद मोईज (चाचा), सय्यद मारूफ (अब्बा), सय्यद गौस आणि सय्यद फरहान (भाई) यांनीही आनंद व्यक्त करून साबेरला पुढील शिक्षणासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या आहेत.

# धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात परळी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात

**रविवारी घाटनांदूर येथे होणाऱ्या सदस्य नोंदणीस उपस्थित रहा – विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, शिवाजीराव शिरसाट, राजाभाऊ औताडे यांचे आवाहन**


परळी । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात सुरू असून उद्या रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून घाटनांदुर येथे सदस्य नोंदणी अभियान संपन्न होणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीचे जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करण्यात आले असून, घाटनांदुर येथील सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटन माजी आमदार संजय भाऊ दौंड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या बियाण्यात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे सदस्यत्व पक्षात नोंदवून घ्यावे असे आवाहन परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे तसेच जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव शिरसाठ यांनी केले आहे.

या अभियानास युवक नेते अजय मुंडे, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील, पांडू तात्या हारे, रंजीत चाचा लोमटे, अजितदादा गरड, जयवंतराव देशमुख, ज्ञानेश्वर बप्पा जाधव, बळवंतराव बावणे, सचिन अपेट, डॉक्टर अजितदादा देशमुख, बाळासाहेब देशमुख, मेहबूब शेख, सुंदरराव साळुंखे, बालासाहेब शेप, शरद बावणे, सुधीर चाटे, बाबुराव जगताप सर, वसंतराव देशमुख, विश्वंभर फड, बंडू गीते, बापूसाहेब गीते, माऊली गरजे, हनुमंतराव गायकवाड, नाथराव घुले, महादेव निळे, अर्जुन जाधव, नामदेव घुले, राखीताई अंधारे, आतार जागीरदार, गणेश देशमुख, शोभाताई कदम, भास्कर गोडबोले, महादेव सोनपीर, रामराव शिरसाट, अरुण नागरगोजे, शिवाजी चव्हाण, बळीराम घोंगडे, वामन बापू जाधव, दादा वैद्य, सुरेश मिसाळ सर, श्रीकृष्ण गीते, मच्छिंद्र वालेकर, बालासाहेब राजमाने, उत्तमराव जाधव, श्रीमंत शिंदे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.



## माजलगाव विधानसभा अध्यक्षपदी जयदत्त नरवडे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा.सुनीलजी तटकरे यांच्या सूचनेप्रमाणे माजलगाव विधानसभा अध्यक्ष पदी श्री.जयदत्त नरवडे यांची नियुक्ती करण्यात आली. तर धारूर तालुकाध्यक्ष पदी श्री.अमोल जगताप आणि वडवणी तालुकाध्यक्षपदी श्री.बजरंग साबळे यांची नियुक्ती करण्यात आली. ही जबाबदारी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विचारानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून एकनिष्ठता तसेच आचरण व विचाराद्वारे समाजात पक्षाच्या पद प्रतिष्ठेची जपवणूक व जनसामन्यांचे प्रश्न सोडवण्यास अग्रेसर राहील हा विश्वास यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी दाखवला व निवडी बद्दल अभिनंदन केले.

# आजच्या तरुण पिढीने नोकरीच्या मागे न लागता उद्योग धंद्याकडे वळावे : आ. धस

आष्टी । प्रतिनिधी

आज जर आपण पाहिले तर राज्यभर तरुण मुलं नोकरीच्या शोधात फिरत असताना दिसतात परंतु तरुणांनी स्वत:चा छोटा मोठा उद्योग उभारून आपण स्वत: उद्योजक व्हायला शिकले पाहिजे असे प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश (आण्णा) धस यांनी व्यक्त केले ते आष्टी तालुक्यातील वेताळवाडी (किन्ही) येथील संत वामन भाऊ इन्फ्रा हॉट मिक्स डांबर प्लांटच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. आ. सुरेश धस यांच्या शुभहस्ते फित कापून या प्लांट चे उद्घाटन करण्यात आले.



पुढे बोलताना धस म्हणाले की, आष्टी तालुक्यात हा डांबर प्लांटची नितांत गरज होती कारण तालुक्यात अनेक कॉन्टॅक्टर आहेत त्यांना रस्त्याचे काम करताना वेळेवर डांबर मिळत नसल्याने कामे थांबली जायची ते वेळेवर होत नव्हते आता कामाला नक्कीच गती मिळणार दुसरे असे की कामे करताना कामाला दर्जा द्या दर्जेदार कामे करा तसेच ते पुढे म्हणाले पहिलगाम ची घटना खरोखर वाईट झाली धर्म विचारून निंदणीय कृत्य केली गेले. अनेक माया माऊलीची कुंकू पुसले गेले. पाकिस्तानची टिकली सुद्धा भारतात येऊ शकली नाही. त्यामुळे सर्व जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार प्लांट चे मालक नारायण वनवे, शहादेव वनवे, इंजिनिअर ज्ञानेश्वर तांदळे यांनी केला. यावेळी ह भ प आदिनाथ महाराज आंधळे, ह भ प रोहिदास महाराज शास्त्री, ह भ प काशिनाथ महाराज शास्त्री, ह भ प राम महाराज शास्त्री, अशोक गर्जे यांचे समयोचीत भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी ह भ प विठ्ठल महाराज (महंत गहिनीनाथ गड) ह भ प आदिनाथ महाराज, ह भ प रोहिदास महाराज, ह भ प काशिनाथ महाराज, ह भ प राम महाराज शास्त्री, बद्रीनाथ जगताप (माजी सभापती पंचायत समिती आष्टी) नामदेव राऊत, संजय गाढवे, दत्ताभाऊ काकडे, शिवाजी नाकाडे, गीते साहेब, अशोक गर्जे शत्रुघन मरकड (माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कडा), ज्येष्ठ नेते विष्णुपंत चव्हाण, विजय गाढवे, युवा नेते अमोल शिंदे, किशोर नाना हंबर्डे, बबन तळेकर, अमोल राजे तरटे, अनुरथ सानप, विकास गोल्हार, बाळासाहेब निकम, विनायक मुळीक, बबन वायवसे, आदिनाथ सानप, बाबुराव केदार, आत्माराम फुंदे, ज्ञानदेव गीते, बबन करंडे, विलास वायबसे, राजेंद्र गोल्हार, संतोष भवर, तुकाराम भवर, नामदेव काकडे, बबन आबा काकडे, सरपंच बाळासाहेब वनवे भरत भवर, अशोक इंगोले, शरद भवर, सुनील वनवे, रोहिदास नागरगोजे, शिवाजी इंगोले, सोमनाथ वनवे, काका नागरगोजे, लहू वनवे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार हरिभाऊ तांदळे ( माजी सरपंच देवळाली) यांनी मानले.

# शिवस्मारकासाठी नेकनूरमध्ये नागरिकांचे आमरण उपोषण



नेकनूर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ स्मारकासाठी ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी या मागणीसाठी अजयसिंह काळे (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून उपोषणास बसले आहेत.

यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नेकनूरमध्ये छत्रपती शिवाजी यांचे अक्षरूढ स्मारक उभारण्यासाठी गेल्या अनेक दिवसापासून शिवप्रेमी मागणी करत आहेत. दि.४ जानेवारी २०२५ रोजी नेकनूर ग्रामपंचायत तर दि.४ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदने देऊनही प्रशासनाने याची दखल घेतली नाही. त्यामुळे नेकनूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अक्षरूढ स्मारकासाठी ग्रामपंचायत मार्फत जागा देण्यात यावी यासाठी धर्मवीर अजयसिंह काळे (दि.१७) शनिवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून उपोषणास बसले आहेत.



बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष अप्पर पोलीस अधीक्षक संजयजी पांडकर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मा.नगरसेवक सुहास पाटील, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे बीड जिल्हाध्यक्ष सुनील कुर्लेकर, विद्याधर खडकीकर महाराज, प्रसन्न खडकीकर इत्यादी.

# शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढुन घ्यावा : आ.पंडित

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यात आजवर सुमारे ५५ % शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलेला आहे. भविष्यात शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य असल्यामुळे शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. तालुका कृषी कार्यालयात त्यांनी खरीप पुर्व कामांचा आढावा घेतला. बैठकीला कृषी विभागातील अधिकाऱ्यांसह खत व बी-बीयाणे विक्रेते उपस्थित होते.




आ. विजयसिंह पंडित यांच्या अध्यक्षतेखाली तालुका कृषी कार्यालयात शनिवार दि.१७ मे रोजी खरीप पुर्व आढावा बैठक संपन्न झाली. गेवराई तालुक्यात एक हजार मेट्रीक टन युरीयाची मागणी असतांना केवळ तीनशे मेट्रीक टन युरीयाची उपलब्धता होत असल्यामुळे युरीयाचा तुटवडा जाणवत असल्या प्रकरणी आ. विजयसिंह पंडित यांनी गांभीर्याने दखल घेवुन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांना या बाबत सुचना केल्या. खताच्या उपलब्धतेसाठी सोईस्कर जालना रॅक पाईंट असल्यामुळे जुना रॅक पार्संट बदलुन जालना येथे करण्याची सुचना आ. पंडित यांनी बैठकीत केली.


तालुक्यातील कपाशी बीयाणांच्या कृत्रिम तुटवड्यातुन शेतकऱ्यांची होणारी आर्थिक लुट थांबविण्याच्या संदर्भाने आ. विजयसिंह पंडित यांनी कृषी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. पोखरा योजनेतील गावांमध्ये जनजागृती करुन शेतकऱ्यांना अधिकाधिक लाभ देण्याच्या सुचना आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी केल्या. विविध योजनांचा आढावा यासह खरीप पुर्व तयारीच्या अनुषंगाने आ. पंडित यांनी बैठकीत सुचना केल्या. यावेळी तालुका कृषी अधिकारी अभय वडकुते, मंडळ अधिकारी सतिष केसभट, अश्विनी मस्के, माधुरी माळी, काकासाहेब पंडित, कृषी पर्यवेक्षक किशोर पठाडे, विस्तार अधिकारी सुरडकर आदींसह खत, बी-बीयाणे विक्रेते शांतीलाल पिसाळ, गोपाळ मोटे, जगदिश काळे, जगदिश बारगजे, उद्धव ढोक, निलेश ढाकणे, अखील शेख, तालेबभाई, हरिभाऊ चाळक, रामभाऊ चाळक, पिंटू कुटे, अजिंक्य ठोसर सह आदी उपस्थित होते.

# रस्ता, मोबाईलला रेंज, एस.टी.बस नसल्याने नागरिकांनी वाडीच काढली विक्रीला

आष्टी । प्रतिनिधी

वाडीत जाण्यासाठी ना रस्ता, ना संपर्क साधण्यासाठी मोबाईल रेंज, ना कसली बस यासह अनेक सुविधांचा अभाव असल्याने वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने वैतागलेल्या नागरिकांनी गुरूवारी सकाळी चक्क वाडीच विक्रीला काढल्याचा निर्धार झालेल्या गाव बैठकीत घेतला.

आष्टी तालुक्यातील वनवेवाडी या येथील १००० लोकसंख्या असलेली वाडी पण गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यांची अतिशय बिकट अवस्था, पक्का रस्ता नसल्याने वनवेवाडीतील नागरीकांना प्रचंड हाल सोसावे लागत आहेत. तर शालेय विद्यार्थीना रस्त्यांनी पायी चालतांना अडचणीचा सामना करावा लागतो. पाउस झाल्यावर या रस्त्याला नदी नाल्याचे स्वरूप येते. वयोवृद्ध नागरिकांना दवाखान्यात येण्यासाठी कोणतीही ॲबुल्यस या गावात येत नाही. तर एस.टी.तर फक्त मतदान पेटी साठीच गावात येते. फडणवीस सरकारने आमचं गाव विकत घ्यावे नाहीतर रस्ता द्यावा अशी निर्धार बैठक अजब ग्रामस्थांनी घेतली आहे. कोणत्याच मोबाईल रेंज नाही. या गावाशी कोणाचा संपर्क होत नाही. झाडावर चढून, जिव धोक्यात घालून मोबाईल रेंज शोधा शोध घेवा लागत आहे.



आमच्या वाडीला रस्ता नाही, मोबाईलला रेंज मिळत नाही, एस.टी.बस येत नाही. अनेक सुविधांचा अभाव असल्याने जर सुविधा मिळाल्या नाही. आम्ही ग्रामस्थांनी वैतागून निर्धार बैठक घेऊन वाडीची विक्री करून गाव सोडणार असल्याचे वनवेवाडी येथील माजी सरपंच विष्णू वनवे यांनी सांगितले.

# चेक अनावरण प्रकरणी एक वर्ष शिक्षा व पंधरा लाख रूपये दंड

**धारूर न्यायालयाचा निकाल**

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील सोनिमोहा येथील विलास देवीदास तोंडे यांनी मा प्रथम वर्ग न्यायदड़ाधिकारी धारूर यांच्या न्यायालयात कलम १३८ एन.आय.अक्ट प्रमाने भारत दिनकर पानारी यांचा विरुद्ध फिर्याद दाखल केली होती. सदर साक्ष पुरावा अंती एडवोकेट जे.बी.बडे यांचा युक्तिवाद ग्राहय धारून आरोपीस १ वर्ष शिक्षा व १५ लाख रूपये दंड केलेला असुन दंड न भरलयास ४ महीने कारावास शिक्षा सुनवन्यात अली आहे.

फिर्यादी विलास देवीदास तोंडे व आरोपी दिनकर पानारी हे उस तोड़नी मुकदम म्हणून काम करत होते सन २०१० ते २०११गळीत हंगामा फिर्यादी विलास देवीदास तोंडे यांनी सदाशिवा शुगर लीमिटेड येथे मुकादम म्हणून काम करत आहेत, फिर्यादीने आरोपी सोबत उस तोड़नी मज़ूर पुरवठा करण्यासाठी साकळी पद्धतिने करार केलेला होता त्याप्रमाणे कारखानयात काम केल्यानंतर आरोपी भारत दिनकर पानारी यांचा कड़े आसलेली बाकी रकम ९ लाख रूपये ची मागनी केल्या नंतर आरोपी ने बैंक ऑफ इंडिया चा धनादेश क्रमांक ४९७६५८ हा फिर्यादी विलास देवीदास तोडे याना चेक दिला होता. सदर चेक फिर्यादी याने खातयात जमा केला अस्ता खात्यात शिलक नस्लयाचा मेमो बैंक यानी दिला. नंतर फिर्यादी विलास देवीदास तोंडे यानी ड.जे.बी.बडे यांचा मार्फत मा प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी धारूर यांच्या न्यायालयात फिर्याद दाखल केली होती सदर प्रकरनात फिर्यादी विलास तोंडे यांची साक्ष नोदवनयात अली व साक्षीदार यांचा पुरावा घेन्याय आला.

एडवोकेट जे.बी. बड़े यानी केलेला युक्तिवाद ग्राहय धरून आरोपी भारत दिनकर पानारी याना १ वर्ष शिक्षा व १५ लाख रुपए दंड केलेला आसुन दंड न भरलयास ४ महीने कारावास शिक्षा सुनवन्यात अली आहे फिरयादी यांचा वतीन एडवोकेट जे बी बड़े न्यायालय धारूर यानी युक्तिवाद केला व त्याना प्रकरनात एडवोकेट एन.बी.पांचाळ, एडवोकेट एम.बी.भोसले यानी सहकार्य केले.

# धारूर शहरातील कसबा विभागातील रस्त्यांची दयनीय अवस्था

धारूर । प्रतिनिधी



किल्लेधारुर शहरात कसबा विभागात पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. हे काम करताना गुत्तेदाराच्या चुकीमुळे नागरिकांना वागणेही अवघड झाले आहे. पाईपलाईन खोदताना निघालेले दगड, माती पाईपलाईन बुजताना खड्यात टाकणे अपेक्षित आहे पण ती थातुरमातूर पध्दितेने बुजली आहे. उरलेली माती रस्त्यावर पसरली गेली असून अवकाळी पावसानेच रस्ते चिखलमय व खड्डेमय झाले आहेत. वाहन तर दुरच पण पायी चालणेही अशक्य झाले आहे. अवकाळी पावसातच ही अवस्था असून पावसाळ्यात यापेक्षाही वाईट अवस्था होणार आहे. नवीन रस्ते होण्यासाठी बराच कालावधी लागणार असून या रस्त्यावर नगर परिषदेने निदान मुरूम तरी टाकून होणारे हाल थांबवावेत अशी कळकळीची मागणी कसबा विभागातील नागरीक करत आहेत.

# समाजसेवक सातिराम ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी



दरवर्षी प्रमाणे यावर्षी हि बार्शी नाका परिसरातील सर्व परिचित असणारे समाजसेवेत स्वत:ला वाहून घेणारे गोरगरिबांना अडचणीच्या वेळी मदत करणारे बांधकाम क्षेत्रातील सुप्रसिद्ध उद्योजक समाजसेवक सातिराम आणा ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अशोक दादा ढोले पाटील संस्थापक अध्यक्ष सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड वतीने मे २० रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत स्थळ जिल्हा रुग्णालय बीड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यात सर्व ब्लड बँकेत रक्ताचा तुटवडा झालेला आहे आपण सर्व रक्तदात्यांनी स्वईचेने येऊन रक्ताचा तुटवडा भरून काढण्यास बहुसंख्येने येऊन रक्तदान करावे.

आपण केलेल्या रक्तदानामुळे निश्चित आनेक गरजवंताला जीवनदान मिळू शकते. हे आपल्या सर्वांचे सामाजिक कर्तव्य व जबाबदारी आहे. तरीही समाजातील सर्व स्तरातील जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या रक्तदान शिबिरा मध्ये रक्तदान करावे, असे आवाहन उपाध्यक्ष प्रकाश तावरे, किरण गलधर, सतिष जाधव सचिन तेलप, राजु ढोले संभाजी ढोले, ज्ञानेश्वर देवळेकर, अशोक दातवासे, भरत वाणी, गणेश शिंदे, सनी शिंदे, सौरभ मुंडे, महादेव सानप, शशांक धन्वे व संतोष जोगदंड व संपुर्ण एम एस कन्स्ट्रक्शन मित्र परिवार व सातिराम आणा ढोले सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड यांनी केली आहे.

# शेख इमरोज़ यांची निर्भीड पत्रकारिता चर्चेत

## सच की आवाज या मालिकेतून मुस्लिम समाजाच्या मुद्द्यांवर कायद्याच्या चौकटीत चर्चा

बीड । प्रतिनिधी

बीड न्यूज आप तक' या हिंदी न्यूज चैनल च्या वतीने 'सच की आवाज' ही विशेष मालिका सध्या प्रेक्षकांच्या विशेष चर्चेचा विषय ठरली आहे. या मालिकेमार्फत मुस्लिम समाजावर होत असलेल्या अन्याय, अत्याचार व भेदभावांविषयी प्रश्न विचारले जात आहेत. मोब लिंचिंग, गोहत्या, लव्ह जिहाद, 'जय श्रीराम' न म्हणाल्यामुळे होणारे हल्ले, दाढी-टोपी पाहून होणारे संशय, अशा अनेक गंभीर प्रश्नांना उजाळा देण्यात येत आहे.

याच पार्श्वभूमीवर आझाद पत्रकार शेख इमरोज़ शरीफ यांनी एका अनुभवी वकीलाशी सविस्तर चर्चा केली. विशेष म्हणजे, या एपिसोडमध्ये बीडचे प्रसिद्ध वकील अनिल बारगजे साहेब सहभागी होते. त्यांनी या संवेदनशील विषयावर कायद्याच्या चौकटीत राहून अत्यंत अमूल्य मार्गदर्शन केले. ही मुलाखत दिनांक १४ तारखेला घेण्यात आली होती. जवळपास अर्धा तास चाललेल्या या संवादात मुस्लिम समाजासमोरील समस्यांवर मते मांडण्यात आली.



या व्हिडिओला सोशल मीडियावर चांगला प्रतिसाद मिळत असून, मुस्लिम समाजातील अनेकांनी तो पाहण्याची आणि विचार करण्याची गरज व्यक्त केली आहे. आझाद पत्रकार शेख इमरोज़ यांनी आपली जबाबदार पत्रकारिता दाखवत अत्यंत बेधडक पद्धतीने प्रश्न विचारले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, त्यांच्या 'सच की आवाज' या मालिकेचा उद्देश केवळ प्रश्न विचारणे नसून समाजातील दबलेल्या आवाजांना व्यासपीठ मिळवून देणे हा आहे. ही मालिका पुढेही सुरु राहणार असून, वेगवेगळ्या क्षेत्रांतील नव्या व्यक्तींशी संवाद साधत समाजाच्या जिव्हाळ्याचे प्रश्न उपस्थित केले जाणार आहेत. 'बीड न्यूज आप तक' च्या माध्यमातून चालवली जाणारी ही मालिका पाहणे मुस्लिम समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे.

या संदर्भात मिळालेल्या प्रसिध्दीपत्रकानुसार, 'सच की आवाज' मालिकेमध्ये भविष्यातही सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे अनेक महत्त्वाचे भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, हा प्रयत्न समाजप्रबोधनाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल ठरणार आहे. अशी माहिती आझाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी दिलेल्या एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT